मार्च

अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मेंदूचा गुण होय.

# काम आणि नीति-

**समसंभोग.** हा प्रकार पुरुषांत व स्त्रियांतही सांपडतो. तो अनादि कालापासून चालत आला आहे, अितकेंच नव्हे तर प्राचीन ग्रीससारख्या सुधारणेच्या शिखरावर असलेल्या देशांत मान्यता पावलेला आहे. हल्लीं जशी लोकांना त्याची लाज वाटते, तशी त्या काळीं वाटत नव्हती आणि ती अगदीं नेहमीची गोष्ट मानली जात होती.

येथें प्रश्न अितकाच आहे की याला विकृति म्हणावें की काय? यांत अेक महत्वाचा मुद्दा असा कीं आधुनिक शारीरतज्ज्ञांच्या दृष्टीनें कित्येकांची समसंभोगाकडे प्रवृत्ति स्वभावतः, म्हणजे अंतःस्त्रावग्रंथींतील वैशिष्ट्यामुळें होते. शिवाय हेंही लक्षांत घेतलें पाहिजे की स्वसंभोगाची प्रवृत्ति जशी सार्वत्रिक दिसते, तशी ही दिसत नाही. भिन्नलिंगी व्यक्तींच्या अभावीं किंवा दुर्मिळते-मुळें कित्येकांना अशी संवय लागते हें जरी खरें, तरी सर्वांनाच ती लागणें शक्य नसतें, कारण अशा स्थितींत त्यांना समसंभोगापेक्षां स्वसंभोगच बरा वाटतो. या गोष्टींचा संबंध अंतःस्त्रावग्रंथींशीं पोंचतो आणि या ग्रंथींबद्दल कोणालाही जबाबदार धरतां येत नाहीं.

या दृष्टीने नराचे बीजकोश मादीच्या शरीरांत आणि मादीचे बीज-कोश नराच्या शरीरांत बसवण्याचे प्रयोग कोंबड्यांवर करून पाहिलेले आहेत आणि त्यांवरून असें निश्चितपणें सिद्ध झालेलें आहे की अशा प्रयोगांनंतर नर मादीप्रमाणें आणि मादी नराप्रमाणें वागूं लागतात. कित्येक

लोक असेही सांपडतात की ते स्त्रियांप्रमाणेंच पुरुषांकडेही आकर्षित होतात. यावरून अितकाच निष्कर्ष निघतो की पुष्कळांना कोणत्या तरी मार्गानें कामपूर्ति होअीपर्यंत उद्दीपन होणें हीच महत्वाची गोष्ट वाटते, तें कोणत्या मार्गानें व्हावें याबद्दल त्यांना विशेष फिकीर नसते.

हा केवळ आवडीनिवडीचा प्रश्न आहे. अेखाद्याला आंबा फार प्रिय असेल, पण आंबा न मिळाल्यास तो पेरूवरही समाधान मानील. तसाच कांहीसा प्रकार संभोगाचे बाबतींत दिसतो. अर्थात् सर्वांचेंच असें होत नाहीं. त्यांना अेक विशिष्ट प्रकार लागतो. तो न मिळाला तर स्वसंभोगाचा मार्ग सर्वांना मोकळा असतोच. अेखाद्याला आंबाच कां आवडतो, याचें शास्त्रीय कारण अजून तरी सांगतां येत नाहीं, तसेंच येथेंही होतें. विशेषतः अेकाच माणसांत जेव्हां भिन्नलिंगी व समलिंगी अशीं दोन आकर्षणें आढळतात, तेव्हां तेथें अंतःस्रावग्रंथींचें कारण कसें लागू होअील? निदान अितकें तरी खरें की समाकर्षण हा अेक भयंकर दुर्गुण समजण्याची जी प्रवृत्ति दिसते, ती चुकीची आहे. हें पूर्वींच सांगितलें आहे की पुरुषांच्या समसंभोगांत मलमार्गाचा उपयोग नेहमीच होतो असें नाहीं. त्याने शारीरिक अिजा होण्याचा संभव असल्यामुळें तो प्रकार गर्ह्यच मानला पाहिजे. परंतु समाकर्षणाचा परिणाम नेहमीच तसा होतो असें नाही. अशा लोकांनाही पुष्कळ वेळां हा प्रकार किळसवाणा वाटतो. कांही असलें तरी सामान्यतः हा प्रकार अपवादात्मकच असतो, तेव्हां तिकडे विशेष लक्ष देण्याचें कारण नाही आणि जोंपर्यंत असे लोक लहान मुलांना फुसलावीत नाहीत, तोंपर्यंत त्यांचा गुन्हा होत नाही असें ब-याच देशांत मानतात आणि तेंच योग्य आहे.

**असामान्य प्रकार.** असे कांही प्रकार फ्रॉअिडने सांगितले आहेत, उदाहरणार्थ प्रेताशीं संभोग. हा प्रकार अत्यंत अपवादात्मक आहे आणि याचें कारण उघडच आहे. अेकतर बहुतेकांना प्रेताची भीति वाटते आणि ती दूर करून त्याशीं असा संबंध करणें अशक्यप्राय असतें. क्वचित् प्रसंगीं अेखाद्या आकर्षक स्त्रीचा नवरा किंवा प्रियकर तिला अेकदम सोडून देण्यास

तयार न झाल्यामुळें असे प्रकार करतो, किंवा युद्धकाळीं सैन्याने अेखादें शहर जबरदस्तीने ताब्यांत घेऊन तेथें लुटालूट करतांना कित्येक सैनिकांना स्त्रियांनी संमति न दिल्यास त्यांना मारून, त्या जिवंत आहेत की मेल्या याची पर्वा न करतां ते आपलें समाधान करून घेतात, असेंही घडतें. पण कांही झालें तरी हा प्रकार अपवादात्मकच आहे यांत शंका नाही.

यापेक्षां कमी अपवादात्मक म्हणजे कित्येकांची मलमूत्रप्रियता. लहान मुलांना स्वतःच्या मलमूत्राबद्दल बिलकुल किळस वाटत नाही हें सर्वांना माहीत आहे, पण सामान्यतः मोठेपणीं किळस वाटूं लागतो. तथापि कांही व्यक्तींच्या बाबतींत याच्या उलट प्रकार दिसतो, म्हणजे अिच्छित व्यक्तीची प्राप्ति न झाल्यामुळें तिच्या मलमूत्राशीं खेळ खेळून कामतृप्ति साधण्याची कांहींची प्रवृत्ति दिसते. या प्रकारांच्या मुळाशीं प्राप्तीची निराशा असते, अेरवीं असे प्रकार होत नाहीत. तेव्हां या प्रकारांना रोगांच्या सदरांत घालण्याचें कारण दिसत नाही.

पशुसंभोगाची गोष्ट अशीच आहे. ज्यांना नैसर्गिक समागमाची संधि मुळीच मिळत नसेल, किंवा निदान दुःसाध्य असेल, असे लोक पशूंकडून समाधान मिळवण्याची खटपट करतात. हा प्रकार लोकांना कितीही भयंकर वाटला, तरी ग्रीक पुराणांत कित्येक देवांनी माणसांशीं समागम करण्याकरतां पशूंचीं रूपें धारण केल्याच्या गोष्टी आहेत. त्यांतूनच 'लीडा अँड् द स्वॉन्' हा विषय बऱ्याच चित्रकारांनी निवडून कामुक चित्रें रंगवलीं आहेत. लीडा नांवाच्या बाओीवर ग्रीक देवांचा राजा ' झ्यूस ' याचें मन गेल्यामुळें त्याने राजहंसाचें रूप घेऊन आपलें उद्दिष्ट साधलें अशी गोष्ट आहे, व चित्रांत अेक राजहंस अेका बाओीशीं प्रेमक्रीडा करीत असलेला दाखवलेला असतो. हें चित्र पुष्कळांनी पाहिलेलें असेल, पण ही गोष्ट माहीत असल्याशिवाय त्यांतलें स्वारस्य लक्षांत येणार नाही. तेव्हां सर्वांनाच ही गोष्ट भयंकर वाटत नाही हें उघड आहे.

आणखी दोन प्रकार म्हणजे सादिझम् आणि मॅझोकिझम्. पहिल्या प्रकारांत दुसऱ्याला शारीरिक किंवा मानसिक दुःख दिल्याने मनुष्याला कामुक समाधान होतें. 'मार्की द साद' नांवाच्या लेखकाने याचें वर्णन दिलें आहे व तो स्वतः अशा प्रकारचा मनुष्य होता. त्याच्यावरूनच सादिझम् हें नांव पडलें आहे. दुसऱ्या प्रकारांत स्वतःला दुसऱ्याने दुःख दिलें असतां कामुक समाधान वाटतें व हा प्रकार 'लिओपोल्ड फॉन सॅशर–मॅझोक' नांवाच्या कादंबरीकाराने वर्णिला आहे व यावरूनच त्याचें नांव या प्रकाराला पडलें आहे.

पहिल्या प्रकारांत जरी कामुक समाधान किंवा कामतृप्तिही अशा मार्गाने होते, तरी त्यांत क्रौर्यापासून वाटणाऱ्या समाधानाला महत्वाचें स्थान असतें. यांत आश्चर्य कांहीच नाही. क्रौर्याच्या अितर प्रकारांनी ज्यांना समाधान होतें असे पुष्कळ लोक असतात. उदाहरणार्थ शिकारीचा ज्यांना नाद असतो, ते क्रूरच असतात. हिंस्र पशूंना मारण्यांत समाजाचा फायदा आहे, किंवा अन्नाकरतां कांही प्राण्यांची हत्या केल्यास ती समर्थनीय ठरेल, परंतु पुष्कळ वेळां शिकार केवळ हौसेकरतां करतात, आणि शिकारी स्वतःचा जीव धोक्यांत घालतो हें समर्थन नव्हे, कारण अशा रीतीने कोणत्याही निरपराधी लोकांशीं युद्ध देखील समर्थनीय ठरेल. तेव्हां क्रौर्यांत कांहींना समाधान वाटतें यांत आश्चर्य नाही, ही नेहमीच्या अनुभवांतील गोष्ट आहे. युद्धांत पुष्कळ वेळां जें निष्कारण क्रौर्य दिसतें तें यामुळेंच. परंतु यांत कामशास्त्राचा प्रत्यक्ष संबंध येत नाही हें उघड आहे. अर्थातच क्रौर्याला कोणी क्षम्य म्हणणार नाही आणि अशा तऱ्हेने कामुक समाधान मिळवण्याचा हक्क कोणालाही नाही.

दुसरा प्रकार याच्या उलट आहे आणि कित्येकांना तो अशक्यच वाटेल, परंतु तो असतो यांत शंका नाही. असे लोक दुसऱ्याकडून फटके देखील मारून घेतात. वेश्यागृहांत दोन्ही प्रकारचे लोक भरपूर पैसे देऊन आपलें समाधान करून घेतात. या दुसऱ्या वर्गांत बऱ्याच बायका मोडतात,

आणि नवऱ्याने मारलें असतां ज्यांना समाधान वाटतें, अशा बायका कित्येकांच्या पाहण्यांत असतील. या दोन विरुद्ध स्वभावांच्या माणसांची परस्पर गांठ पडली तर दोघांचेंही समाधान होअील आणि मग कोणाला नांवें ठेवण्यास जागा राहणार नाही. पण दुर्दैवाने पुष्कळ वेळां पहिल्या वर्गांतील माणसाच्या हातांत सत्ता गेल्यास अितरांना धोका असतो, तेव्हां असे लोक पोलीससारख्या खात्यांत नेमतां नयेत हें उघड आहे. हिटलर या वर्गांतला होता असें म्हणतात.

**अधिष्ठान-विकृति.** भिन्नलिंगी व्यक्तीच्या शरीराच्या कोणत्याही भागाचें अेखाद्याला विशेष आकर्षण वाटेल यांत नवल नाही. तो केवळ प्रकृतिभेद मानतां येअील. कित्येकांना केसांचें किंवा पायांचें आकर्षण वाटतें, कित्येकांना वस्त्रांचें देखील आकर्षण वाटतें आणि म्हणून कित्येक लोक स्त्रियांच्या वस्त्रांचा खाजगी संग्रह बाळगतात. याहीपलीकडे जाऊन कित्येकांना विशिष्ट प्रकारच्या स्त्रिया विशेष प्रिय होतात, उदाहरणार्थ कित्येकांचें नटींशिवाय समाधान होत नाही, कित्येकांना मोलकरणीच लागतात. त्याचप्रमाणें स्त्रियांना लष्करी पोषाखांतले पुरुष आवडतात, अित्यादि. या लोकांचें कामुकतेचें अधिष्ठान चुकतें असें पाहिजे तर म्हणावें, पण जोंपर्यंत त्यांतून शेवटीं नेहमीच्याच पद्धतीनें कामपूर्ति होते, तोंपर्यंत या प्रकारांना विकृति म्हणण्याचें कारण नाही. याचा खोल विचार केल्यास असें दिसतें कीं अेखादा मनुष्य ज्या कारणांकरतां अेका स्त्रीपेक्षां दुसरी पसंत करतो, तीं कारणें देखील याच सदरांत येतील. कारण दोन स्त्रियांच्या बाह्य स्वरूपांत फरक म्हणजे कोणत्या तरी विशिष्ट अिंद्रियांत ( म्हणजे शरीराच्या भागांत ) असणार. अगदीं बारीक सारीक फरकांना देखील पुष्कळ लोक महत्व देतात, ते तें कबूल करतील की नाही हा भाग वेगळा. पण या प्रकृतिभेदाला विशेष महत्व देण्याचें कारण नाही.

तेव्हां ज्या प्रकारांना सामान्यतः विकृति मानण्याची पद्धत आहे, त्यांचे दोन वर्ग पडतात. पहिला प्रकार म्हणजे समागमाशिवाय अितर

मार्गांनी कामतृप्ति करून घेणें ( स्वसंभोग, अित्यादि ). दुसरा प्रकार म्हणजे समाजाने मान्य केलेल्या व्यक्तींशिवाय अितर व्यक्तींच्या द्वारें कामतृप्ति साधणें ( समसंभोग, जवळच्या नात्यांत संभोग, अित्यादि ). पण कामतृप्ति हें अेक शारीरिक कार्य आहे आणि त्याच्या कोणत्याही प्रकाराने जोंपर्यंत समाजाचें नुकसान होत नाही, तोंपर्यंत त्यांत नीतीचा संबंधच नाही. क्लीबनीतीने जबरदस्तीने त्यांतल्या कांहीं प्रकारांवर नीतीचा छाप मारून बाकीचे प्रकार निषिद्ध मानलेले आहेत. ही चूक कोणाची ? जोंपर्यंत दुसऱ्याचें नुकसान होत नाही, तोंपर्यंत लोकांना आपआपल्या मर्जीप्रमाणें वागूं देणें, हाच समंजस मार्ग नव्हे काय ? या दृष्टीनें पाहिलें असतां आपल्याला पुढील सिद्धांत मान्य करावे लागतील.

१. स्त्रीपुरुषसमागम अेवढा अेकच कामतृप्तीचा नैसर्गिक मार्ग आहे हें खोटें. तो प्रजोत्पत्तीचा अेकच मार्ग आहे हें मात्र खरें.

२. अितर मार्गांनी जरी प्रजोत्पत्ति होत नसली, तरी कामतृप्ति होते, आणि त्यांत जोंपर्यंत दुसऱ्याचें नुकसान नाही, तोंपर्यंत त्यांत नीतीचा संबंध नाही.

३. या संबंधांत दुसरी व्यक्ति कोणती असेल, हा शरीरशास्त्राचा प्रश्न नाही. कोणत्या व्यक्तींशीं संबंध निषिद्ध समजावा, हा केवळ सामाजिक संकेत असतो आणि तो देशकालमानाने बदलतो. तेव्हां अशा गोष्टींना शास्त्रीय दृष्ट्या महत्व देतां नये. ज्यांच्यावर या संकेतांचा मानसिक परिणाम होत नाही, त्यांच्या आरोग्याला त्यांमुळें धोका पोंचत नाही.

नुकसान होतें तें कोणत्याही प्रकारच्या अतिरेकाने. स्वसंभोगाच्या अतिरेकाने नुकसान होतें, तसेंच समागमाच्या अतिरेकानेही होतें. मद्याच्या अतिरेकाने जसें नुकसान होतें, तसें शुद्ध पाणी देखील फाजील प्याल्यानें नुकसानच होतें. दारूबंदी किंवा ब्रह्मचर्याचा उपदेश हे अतिरेकावर योग्य उपाय नव्हत. कित्येक लोक जन्मभर स्वसंभोगाशिवाय कोणत्याही प्रकाराचा उपयोग करीत नाहीत आणि त्यांचें कोणतेंही नुकसान होत नाही. तसेंच

कित्येक लोक जन्मभर नियमितपणें मद्य पीत असूनही त्यांचें कोणतेंही नुकसान होत नाहीं, अितकेंच नव्हे तर प्रकृतीला त्याची मदतच होते. कोणत्याही संवयीला अतिरेकाचे परिणाम चिकटवतां नयेत.

या बाबतींत मुख्य महत्वाची गोष्ट अशी की कामवृत्तीचीं जीं विकृत समजलेलीं रूपें हल्ली दिसतात, तीं बहुतेक व्यक्तींचे बाबतींत चालू क्लीब-नीतीच्या परिणामीं उत्पन्न झालेलीं असतात. या बाबतींत ही अनैसर्गिक नीति सोडून दिल्यास बहुतेक लोक भिन्नलिंगी समागमाच्या धोपट मार्गानेंच जातील यांत शंका नाही. अर्थात् अितर प्रकार अजीबात नाहीसे होणार नाहीत, कारण कित्येक वेळां ते प्रकृतीवर अवलंबतात. या प्रकारांनीं जें नुकसान होतें असें दिसतें, तेंही सामाजिक समजुतींमुळेंच होतें, कारण आपण कांहीतरी भयंकर गोष्ट करीत आहों अशी आडमार्गांनी जाणारांची कल्पना होऊन त्यांना मुख्यतः मानसिक त्रास होतो. याला अेकच उपाय म्हणजे सहिष्णुता. ही मतांचे बाबतींत जशी अिष्ट आहे, तशीच वागणूकीचे बाबतींतही तितकीच अिष्ट आहे. जोंपर्यंत मनुष्य कोणाचें नुकसान करीत नाही, तोंपर्यंत त्याला मनसोक्त वागूं द्यावें, हाच खरा शहाणपणा आहे. पण अर्थातच हें अंमलांत यायचें असेल, तर जगांतले सगळे अरेराव नाहीसे झाले पाहिजेत.

---

# गांधीजींच्या घोडचुका

आपण हिमालयाअेवढ्या चुका केल्या आहेत, असें गांधी कधींकधीं म्हणत असत, पण आपल्या खऱ्या चुका कोणत्या हें त्यांना कळलेंच नाहीं, आणि याचा परिणाम असा झाला आहे की त्यांच्या अनुयायांना अजूनही त्या कळलेल्या नाहीत. कारण त्यांची अक्कल गांधींकडे गहाण होती आणि ते अकस्मात् निधन पावल्यामुळें ती त्यांच्याबरोबरच गेली. अशा कांही

चुका वर्धा येथील ' संगम ' नांवाच्या हिंदी मासिकाचे संचालक ' स्वामी सत्यभक्त ' यांनीं अेका पत्राला उत्तर देतांना दाखवल्या आहेत. तेवढ्या भागाचा सारांश पुढें दिला आहे.

१. दुनियेची आर्थिक समस्या सोडवण्याकरतां गांधीजींनी संदेश दिला की गिरण्या बंद कराव्या आणि चरखा व अितर ग्रामोद्योग सुरू करावे. प्रत्येक व्यक्तीने किंवा कुटुंबाने आपआपल्या गरजा भागवाव्या, या दृष्टीने गांधीजी असें लिहूं लागले की ' जो कांतील तोच नेसेल आणि ज्याला नेसायला पाहिजे असेल त्याने कांतलें पाहिजे, व असें झालें तर गिरणीमालकांना जनतेच्या पैशाचें शोषण करतां येणार नाही. पण हा मार्ग अशक्य आहे, अितकेंच नव्हे तर त्यांत कोणाचें कल्याणही नाही. उलट अनेक प्रकारचें नुकसान आहे. ( क ) खरोखरच देशांतील गिरण्या बंद झाल्या तर परदेशी कपडा बाजारांत भरेल आणि पैसा परदेशांत गेल्यामुळें गरीबी वाढेल. ( ख ) हस्तोद्योगांपासून उत्पन्न अितकें कमी होअील कीं देश नेहमीच गरीब राहील. कोठेच गिरण्या नव्हत्या, तेव्हां सर्वच देशांत चरखे होते, पण आतां अितर देशांत गिरण्या आणि फक्त हिंदुस्थानांतच चरखा, असें झाल्यामुळें अितर देशांचे मानाने हिंदुस्थान गरीब होअील आणि गरीब देशांना आज जगांत मान नाही आणि स्वतंत्र स्थानही राहणें कठिण. ( ग ) गांधींचा नियम मानायचा असेल, तर जो अन्न उत्पन्न करील त्यानेच खावें व खायला पाहिजे असेल तर अन्न उत्पन्न करावें, असें कां म्हणूं नये ? तसेंच जो कागद, लेखणी, वगैरे उत्पन्न करील तोच लिहील, असेंही म्हणतां येअील. सारांश आर्थिक विकास ज्या श्रमविभागावर आधारलेला असतो, तोच अशाने नष्ट होअील आणि देश पुन्हा रानटी दशेंत जाअील, मग गांधीवाद्यांनी त्याला पाहिजे तर सत्ययुग म्हणावें. ( घ ) हस्तोद्योगामुळें गांव संकुचित होऊन कोणत्याही बाबतींत देशव्यापी संघटना अशक्य होअील. ग्रामाभिमानांतच लोक दंग होतील आणि राष्ट्रीयता देखील नाहीशी होअील, मग मानवतेची गोष्ट कशाला ? ( ङ ) यंत्रें असतांनाही लोक त्यांचा

उपयोग करणार नाहीत असें मानणें म्हणजे मनुष्यस्वभावाचें अज्ञान आहे, स्वतःची व दुसऱ्याची फसवणूक आहे. ( च ) चरख्याच्या प्रसाराने लोकांना वाटूं लागतें की आतां गिरणीमालकांचें शोषण बंद झालें, पण तें बंद होत नाही, लोक गिरणीचें कापड वापरीतच असतात. हें पक्कें माहीत असल्या-मुळे गिरणीमालकही चरख्याच्या प्रसाराकरतां मोठ्या रकमा द्यायला कमी करीत नाहीत, अितकेंच नव्हे तर ते स्वतःही चरख्याचें प्रदर्शन करतात आणि खादी नेसून ' बापूकी जय ' अशी घोषणाही करतात. आणि कां नाही करणार ? त्यांचें शोषण चालूच असतें. या शोषणावर खरा उपाय मार्क्सने सुचवला आहे, गांधींनी नव्हे.

२. दुसरी समस्या युद्ध बंद करण्याची. गांधींनी सत्याग्रहाचा उपाय सुचवला, तो हास्यास्पद आहे. त्याच्या जोरावर केलेल्या राजकीय चळवळी तर फसल्याच, पण सत्याग्रह सफल होण्याची कांही आशा राहिली असेल, तर काश्मीर आणि हैदराबादमधील घटनांनी तर कट्टर गांधीवाद्यांचाही अहिंसेवरचा विश्वास उडाला. दंग्याचे वेळीं तर गांधीजींची अहिंसा बेकार ठरली. तेव्हां या बाबतींत जगाला कोणताही मार्ग गांधींनी दाखवला नाही. सत्याग्रह व अहिंसा कांही मर्यादेंत यशस्वी झालीं तरीही आंतरराष्ट्रीय राज-कारणांत त्यांचा उपयोग नाही. युद्धाचीं कारणें नाहीशीं झाल्याशिवाय युद्धें थांबणार नाहींत. सगळ्या जगाचें अेक राष्ट्र होईपर्यंत युद्धें थांबण्याची आशा व्यर्थ आहे.

३. तिसरी समस्या धर्माची. म्हणजे या वैज्ञानिक युगाला साजेल अशा रीतीने धर्मात परिवर्तन करण्याची. या बाबतींत गांधींनी कांही प्रगति तर केलीच नाही, उलट आपल्या प्रतिगामी विचारांनी लोकांची बौद्धिक पुंजी नष्ट केली. ' अीश्वर न मानणारा सत्याग्रह करूं शकत नाही, रोटी-पेक्षां प्रार्थनेचें मूल्य अधिक आहे, बिहारचा भूकंप अस्पृश्यतेमुळें झाला, रामायण–महाभारतांतील युद्धें रूपकें आहेत, राम अीश्वर होता, व राम-नाम हा सर्व रोगांवर सर्वांत चांगला उपाय आहे, अित्यादि अंधश्रद्धापूर्ण

आणि विज्ञानाची विडंबना करणारीं विधानें त्यांनी जनतेसमोर ठेवलीं. लोकांना बुद्धिवादी न बनवतां त्यांनीं अंधश्रद्धेला उत्तेजन दिलें. अर्थांत् अंधश्रद्धालु जगानें त्यांची याबद्दल वाहवा केली, पण मानवतेच्या आणि विचाराच्या दृष्टीनें याचा उपयोग नव्हता.

४. चौथी समस्या धर्मसमन्वयाची. सर्व धर्मांना सारखे मानून देखील गांधींना धर्मांचा समन्वय करतां आला नाही. पूर्वी जें काम कबीरासारख्यानें केलें होतें, तेथपर्यंत देखील गांधी पोंचूं शकले नाहीत. उदाहरणार्थ ( क ) लक्ष्मीनारायणाचे मंदिरांत अेकदां माझें प्रवचन झालें होतें, तेव्हां मी सांगितलें की मी प्रत्येक हिंदूला अर्धा मुसलमान आणि प्रत्येक मुसलमानाला अर्धा हिंदु बनवूं इच्छितों. या प्रवचनाला सेवाग्रामांतीलही कांही सुशिक्षित मंडळी बसली होती. या लोकांनी गांधीजींजवळ माझ्या प्रवचनाचा उल्लेख केला. तेव्हां ते म्हणाले की मला ही गोष्ट पसंत नाही. प्रत्येक हिंदूने पुरा हिंदु व प्रत्येक मुसलमानाने पुरा मुसलमान रहावें, अशीच माझी अिच्छा आहे. याचा सारांश असा की हिंदूंना हिंदु धर्म आणि मुसलमानांना अिस्लाम धर्मच लाभदायक आहे. तरीपण या देशांतले कोट्यवधि मुसलमान पूर्वी हिंदुच होते! धर्म जर मुळांत अेकच आहेत, तरमग असें कां? गंगा–यमुना संगम झाल्यानंतर देखील हें दोन प्रकारचें पाणी वेगवेगळें वहावें काय? भारतांत जर हिंदु–मुसलमानांचा संगम झाला, तर तशाच तऱ्हेचें मिश्रण झालें पाहिजे होतें. ( ख ) गांधीजींच्या वेद, उपनिषद, गीता, रामायण, वगैरेवर आधारलेल्या प्रार्थना जेव्हां मीं अैकल्या, तेव्हां मीं या अेकांगी प्रार्थनांना विरोध केला व त्यांना पत्रें लिहिलीं, व यानंतर कांही दिवसांनी त्यांच्या प्रार्थनांत कुराणांतील वचनें वाचलीं जाऊं लागलीं. तरीदेखील ते संस्कृत, आरबी अित्यादि मृत भाषांनाच चिकटून राहिले. दोनचार मुडदे अेकत्र आणल्यास जिवंत मनुष्य होअील, अशी त्यांची कल्पना असावी. (ग) सर्व धर्म सारखे आहेत हें सामान्य जनतेच्या गळीं उतरवण्याकरतां त्यांनी कोणताही कार्यक्रम आंखला नाही. ते स्वतःला जन्मभर हिंदु आणि वैष्णव

म्हणवीत राहिले, त्यांना कोणताही समन्वयात्मक शब्द सांपडला नाही. सारांश, गांधींनी जरी धार्मिक सहिष्णुता वाढवली व दुसऱ्या धर्मांचा आदरही केला, तरी धर्मविरोधाचें मूळ उखडून टाकण्याचा प्रयत्न त्यांनी केला नाही, सर्वसंग्रहाचा प्रयत्न केला नाही.

५. पांचवी समस्या जातिभेदाची. या बाबतींत गांधींनी सुधारकाचें काम केलें, पण ते जवळजवळ शेवटपर्यंत वर्णव्यवस्थेचे समर्थकच राहिले. अस्पृश्यांना त्यांनी हरिजन नांव दिलें, तरी तो वर्ग वेगळाच राहिला. यापेक्षां राजा राममोहन राय व स्वामी दयानंद यांनीही अधिक काम केलें होतें आणि अिस्लाम आणि क्रिस्ती धर्मांची नजर तर या सर्वांपेक्षां चांगली, कारण त्यांत जाती नाहीत. गांधींनी जरी अस्पृश्योद्धाराकरतां बरेंच काम केलें, तरीपण यापेक्षांही जास्त काम त्यांच्या अगोदरच मुसलमान, क्रिस्ती, ब्राह्मसमाज, आर्यसमाज, जातपात तोडक मंडळ, यांनी केलें होतें. यावरून निष्कर्ष असा निघतो कीं या महत्वाच्या प्रश्नांच्या बाबतींत गांधींजींनी प्रगतीचें मार्गदर्शन करण्याअैवजीं उलट प्रतिगामी मार्गच दाखवला.

---

# प्रभाकर पाध्यांची आणखी घसरगुंडी

लेखक, ना. स. बापट.

२७.३.४९ च्या 'नवशक्तींत' प्रभाकर पाध्यांनी 'बुद्धिवाद' व 'केवल बुद्धिवाद' यासंबंधीच्या त्यांच्या कल्पनांवर प्रकाश पाडण्यासाठीं खुलासा केला आहे. या खुलाशाने पाध्यांच्या विचारसरणींतील घोटाळे अधिकच उघडे झाले आहेत.

ज्यांना पाध्ये 'केवळ बुद्धिवादी' म्हणतात, त्यांची विचारपद्धति कैफ आणणारी असते असें ते म्हणतात. हें अर्थातच त्यांच्या 'विनम्रतेला' धरूनच आहे. याच विनम्रतेमुळें त्यांनी अेका ठिकाणीं 'मी केलेल्या विवेचनाचा

बापटांना बोध झाला नाही,' असें विधान केलें आहे. पाध्यांचा प्रस्तुत खुलासा वाचून माझें अज्ञान मुळीच कमी झालेलें नाही. आमच्या ज्ञानांत भर टाकण्यासाठीं माझ्या खालील मुद्यांना उत्तरें देऊन ज्ञानाचा प्रकाश पसरवावा अशी विनंति आहे.

पाध्यांची केवल बुद्धिवादाची व्याख्या पुढीलप्रमाणें आहे. केवल बुद्धिवाद म्हणजे 'विश्वाचें अंतिम ज्ञान केवळ बुद्धीनेच होतें, बुद्धि हेंच ज्ञानाचें अेकमेव साधन आहे,' असा सिद्धांत. याच्या उलट 'नुसता' बुद्धिवाद बुद्धि हें ज्ञानाचें अेकमेव साधन आहे असें मानीत नाही. बुद्धीशिवाय ज्ञानाचीं अंत:प्रेरणेसारखीं अितर साधनें असूं शकतील, हें त्याला मान्य असतें, **पण बुद्धि हें ज्ञानाचें पडताळून घेण्यासारखें साधन म्हणून सर्वांत विश्वसनीय साधन आहे असें त्याला वाटतें. मात्र त्याचबरोबर बुद्धीने 'विश्वाचें अंतिम ज्ञान' प्राप्त होणें शक्य नाही, जगाचें सबंध सत्य केवळ बुद्धीनें कळूं शकणार नाही, अशीही त्याची खात्री झालेली असते.**

पाध्यांच्या या विधानांतील भयंकर व हास्यास्पद विसंगति जराशा मननाने भडकपणें कळून येते. पहिल्याने ते म्हणतात की बुद्धि हें ज्ञानाचें पडताळून घेण्यासारखें म्हणून **सर्वांत विश्वसनीय साधन आहे,** आणि नंतर म्हणतात की **जगाचें सबंध सत्य केवळ बुद्धीने कळूं शकणार नाही अशीही त्याची खात्री झालेली असते.** हीं दोन वाक्यें अेकत्र वाचलीं कीं ज्ञान ही कल्पनाच यथार्थतेने अशक्य होअील असा निष्कर्ष निघतो.

विश्वाचें 'अंतिम ज्ञान' आपल्याला झालें आहे, असें कोणीही बुद्धिवादी आज म्हणत नाही. तो अेवढेंच म्हणतो की जें ज्ञान या नांवाला पात्र होतें, तें बुद्धिवादानें मिळतें किंवा बुद्धीने पारखल्यावरच त्या पदवीला पात्र होतें. त्याला असेंही वाटतें की जर आणखी ज्ञान मिळवायचें असेल, तर तें बुद्धिवादाने मिळतें, किंवा बुद्धीने पारखल्यावरच त्या पदवीला

पात्र होतें. तें बुद्धिवादानेच मिळेल, किंवा बुद्धीनेच पारखून घ्यावें लागेल. अंतिम ज्ञानाची कल्पना विवेचनीय आहे. या संबंधांत लेव्ही यांनी सत्याला अंधारांत प्रकाश देणाऱ्या दिव्याची उपमा दिली आहे, ती फार उद्बोधक आहे. तोच दाखला बुद्धीविषयीं वापरतां येईल व असें म्हणतां येईल की विशिष्ट मर्यादेपलीकडे जें अज्ञात आहे, तें ज्ञानाच्या कक्षेत आणण्यासाठीं बुद्धीचाच दीप घ्यावा लागेल.

हा वाद सोडून, जेवढें ज्ञान आहे तें पारखण्याचें सर्वश्रेष्ठ साधन बुद्धि हें मान्य केलें, की केवल बुद्धिवाद व परंपरासंमत बुद्धिवाद अेकच असल्याचें दिसतें. मात्र हा पाध्येप्रणीत बुद्धिवाद नव्हे, कारण त्यांचा ' नुसता ' बुद्धिवाद आहे. हा नुसता बुद्धिवाद अेका हाताने बुद्धीला अंतिम निर्णयाचा अधिकार देतो व त्याच वेळीं दुसऱ्या हाताने तो अधिकार काढून देतो. **सारांश पाध्ये यांची भूमिका पाध्ये विरुद्ध पाध्ये अशी आहे**. कसें तें पहा.

ज्ञान अंतिम झालें की नाही, हें पाध्ये कसें ठरवणार? कोणत्या मर्यादेपर्यंत ते बुद्धीचा निर्णय मानणार? आणि या हद्दीबाहेर बुद्धीचा अधिकार संपला, हें पाध्ये स्वतःच्या बुद्धीशिवाय दुसऱ्या कोणत्या साधनाने ठरवणार? अमुक अेका कक्षेबाहेर बुद्धीचा आश्रय सोडून देण्याचें कारण काय, असें विचारल्यास ते काय सांगणार? बुद्धीच्या अभावीं मानवाला कोण मार्गदर्शन करणार? खरी स्थिति अशी आहे की बुद्धिवाद पुरा स्वीकारला तरी पाहिजे, किंवा पुरा फेकून दिला पाहिजे. ' केवल बुद्धिवाद ', 'नुसता बुद्धिवाद' वगैरे संज्ञा निर्माण केल्याने होणारी स्वयंविरोधी भूमिका मार्मिक दृष्टींतून निसटणार नाही.

पाध्यांचीं आणखी कांहीं विधानें अशीं. ' मानवाच्या बुद्धीला निसर्गानेच कांही मर्यादा घातलेल्या आहेत. जग हें सारखें बदलत असतें, अखंड गतिमानता हा विश्वाचा धर्म आहे. ' या विधानांत बुद्धिवादाच्या दृष्टीने नवीन असें कांहीच नसून या सिद्धांताच्या प्रस्थापनेसाठीं अविरत

प्रयत्न शतकोशतकें जर कोणी केले असतील, तर ते बुद्धिवाद्यांनीच आणि याकरतां श्रद्धावाद्यांशीं त्यांना कठिण झगडे करावे लागलेले आहेत. पाध्यांचे खरे सिद्धांत मानवाला बुद्धीनेच कळलेले आहेत. 'तर्काच्या प्रयोगपात्रांत जीवनाची सरिता सामावतां येअील हा भ्रम' कोणाही सुज्ञाला झालेला नसून, तो भ्रम बुद्धिवाद्यांना झाला आहे असा सोयीस्कर समज पाध्यांनी करून घेतला आहे. जीवनाच्या धारणेसाठीं बुद्धीचा उपयोग करावा लागतो. तीवांचून अन्य श्रेष्ठ साधन नाही आणि तसें साधन जोंपर्यंत पाध्यांना किंवा अितर कोणालाही सिद्ध करतां आलेलें नाही, तोंपर्यंत बुद्धीच्याच साह्याने विश्वांतले वा संसारांतले प्रश्न हाताळले पाहिजेत. अविरत बदलणाऱ्या विश्वाचीं स्थिर चित्रें प्रगत बुद्धि काढीत नाही, आणि संपूर्ण ज्ञान झाल्याचा गैरसमजही करून घेत नाही. अितकेंच काय, पण बुद्धिवादी मनुष्य आपले निष्कर्ष अधिकाधिक सत्यस्पर्शी व्हावे म्हणून सतत श्रम करीत असतो. त्यासाठीं बेर्गसाँचें पुस्तक खाकोटीस मारून बुद्धिवाद्यांवर निराधार टीका करण्याने पाध्यांसारख्यांना आपली बाजू सिद्ध होऊन 'अिंप्रेशन' पडल्यासारखें वाटत असलें, तर तें सवंग समाधान व आत्मवंचना आहे.

---

# रशियांतील हुकूमशाही

( बरट्रँड रसेलच्या आधारें )

अेका माणसाच्या किंवा अेका लहानशा गटाच्या हातांत पोलीसवर आणि सैन्यावर सत्ता आली, म्हणजे त्या गटाला राजकीय विरोधकांचा नायनाट करतां येतो आणि अेका पिढीच्या अवधींत शिक्षणसंस्थांच्या आणि वृत्तपत्रांच्या साह्याने आपण फार उच्च दर्जाचे आणि लोकहितेच्छु राजकर्ते आहोंत असा बहुसंख्य जनतेचा गैरसमज करून देतां येतो. या

अवधींत त्या गटाला स्वतःची सत्ता भक्कम करतां येते आणि अितरांच्या जिवावर स्वतःची संपत्ति वाढवतां येते. अेकीकडे त्या गटाचा अन्याय आणि हुकूमशाही हीं वाढत जातात, आणि त्याचबरोबर लोकप्रियताही वाढते, करण प्रचाराचीं सर्व साधनें सरकारने काबीज केल्यामुळें कोणालाही सरकारविरुद्ध कोणतेंही सत्य सांगणेंच अशक्य होतें.

हें चित्र काल्पनिक नाही, रशियांत हें प्रत्यक्ष घडलें आहे. तेथें ज्या बोल्शेव्हिक पक्षाच्या हातीं आज सत्ता आहे, त्याचें लोकसंख्येशीं प्रमाण प्रारंभीं शेंकडा अेक देखील नव्हतें. हाच प्रकार जर सर्वत्र व्हायला नको असेल, तर लोकशाहीला टिकवण्याचा आणि बळकटी आणण्याचा कसून प्रयत्न झाला पाहिजे.

सरकारला ज्या गोष्टी लपवून ठेवण्याची अिच्छा असेल, त्यांना प्रसिद्धि दिली पाहिजे. सरकार बदलण्याचा कायदेशीर मार्ग असला पाहिजे. जनतेचें स्वातंत्र्य किंवा अन्न हिरावून घेण्याचा कोणताही बेकायदा मार्ग सरकारला मोकळा असतां नये, आणि याकरतां न्यायाधीशांवर सरकारचा अधिकार चालतां नये. सरकारने राजकीय विरोधकांवर केलेल्या आरोपांची–उदाहरणार्थ राजसत्ता जबरदस्तीनें उलथून पाडण्याकरतां कट केल्याच्या आरोपांचीं–चौकशी काळजीपूर्वक आणि निष्पक्षपातानें झाली पाहिजे, आणि ही चौकशी चालू असतांना आरोपीचे हाल करण्याची संधि पोलीसला मिळतां नये, किंवा आरोपींच्या कुटुंबांनाही आरोपींच्या गुन्ह्यांबद्दल शिक्षा होतां नये.

मागे अशी कल्पना होती कीं सदिच्छाप्रेरित हुकूमशाही ही सर्वांत उत्कृष्ट राज्यव्यवस्था होय. हा भ्रम अठराव्या शतकांत नाहीसा झाला होता, परंतु अलीकडे तो पुन्हा डोकें वर काढू पहात आहे, आणि ज्यांना सत्ता काबीज करण्याची आशा आहे, किंवा जे चालू अन्यायांना अत्यंत कंटाळलेले आहेत, अशांकडून या कल्पनेस उत्तेजन मिळत आहे. परिणामीं या शास्त्रीय युगांत हुकूमशाहीचें प्रस्थ माजण्याचा संभव आहे. याकरतां अशा व्यवस्थेंतील दोष स्पष्टपणें सांगण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

पहिला दोष म्हणजे आर्थिक अत्याचार. अितरांच्या मानाने स्वतःचें उत्पन्न वाढवण्याचे प्रयत्न सत्ताधकारी गटाकडून नेहमी होत असतात. सत्तेबरोबर प्रचाराचीं साधनेंही त्यांच्याच हातांत असल्यामुळें गरिबांना जेमतेम जिवंत राहण्यास पुरेल त्यापेक्षां जास्त कांहीं देण्याचें कारण त्यांना भासत नाहीं. गरीब आणि श्रीमंत यांच्या मिळकतींत अिंग्लंडपेक्षां पुष्कळच जास्त फरक रशियांत सांपडतो, आणि कित्येक तज्ञांचें मतें हा फरक अमेरिकेपेक्षांही रशियांत जास्त आहे. अल्पसत्ताक राज्यपद्धतींत हें अपरिहार्य आहे, कारण संपत्ति नेहमीच सत्तेवर अवलंबून असते. सत्ता जनतेच्या हातांत असल्याशिवाय ही आर्थिक विषमता कधींही दूर होणार नाही.

आणखी अेक दोष म्हणजे शिक्षणाच्या बाबतींत. लोकांना अन्यायाची जाणीव होणें हें सत्ताधारी गटाला धोक्याचें असतें, तेव्हां जनतेला शिक्षण न देण्यांत, किंवा चुकीचें शिक्षण देण्यांत, या गटाचा फायदा असतो. आणि हल्लीच्या युगांत ही दुसरीच पद्धत जास्त व्यवहार्य असते. गरिबांना शिक्षण सक्तीचें करावें, त्यांना वाचनाचीं साधनें पुरवावीं, पण त्यांनी काय शिकावें व काय वाचावें हें मात्र सरकारने ठरवावें. अशा रीतीने सरकारला अनिष्ट वाटणारें ज्ञान जनतेपासून दूर ठेवतां येतें आणि ज्ञानाचा सत्याशीं कांही संबंध रहात नाही. यूरोपांत पश्चिमेकडील देशांत जमिनीखालून चालणाऱ्या आगगाड्या असतात, असें जर हल्ली मॉस्को शहरांतील सामान्य माणसाला सांगितलें, तर त्याला ती थापच वाटते, कारण शिक्षण हुकूमशाही सरकारच्या हातांत आहे.

जनतेची अशी फसवणूक मोठ्या प्रमाणावर करण्याकरतां जनतेपर्यंत ज्ञान कोठूनही झिरपून पोंचू नये म्हणून अतिशय खबरदारी घ्यावी लागते, आणि याचा परिणाम असा होतो की लोक हळूहळू विचारच करीत नाहीसे होतात, आणि कोणताही नवा विचार त्यांच्या डोक्यांतच येणें अशक्य होतें. सरकारने पसंत केलेल्या कल्पना पाठ म्हणण्यापलीकडे कोणाचीही मजल जात नाही, अितकी जनतेची सनातनी वृत्ति बनते.

अशा राज्यपद्धतींत साहजिक होणारा आणखी अेक अत्याचार म्हणजे कनिष्ट प्रतीच्या नोकरांशीं अत्यंत क्रौर्याची वागणूक. रशियांत जी सक्तीच्या मजुरीची पद्धत सध्यांच्या हुकूमशाहीचें अेक कायमचें अंग होऊन बसली आहे, तींत अमानुष क्रौर्य आढळतें. बेजबाबदार सत्ता कोणाच्याही हातीं आल्यास तो अत्यंत क्रूर होतो, हा मनुष्यस्वभाव आहे.

---

# पत्रव्यवहार

## १

फेब्रुआरीचे अंकांतील श्री. कपाळे यांचें पत्र व आपलें उत्तर दोहींमिळून मुद्दा अेकच आहे, पणः त्यांत मौलिक सुधारणा होण्याचें कोणी सुचवीतही नाही व करीतही नाही. अेक पोस्टाचा अनुभविक नोकर म्हणून खालीलप्रमाणें कारणें व उपाय सुचवीत आहें. पोस्टकार्डाला 'कांहीही लावून पाठवावयाचें नाही,' असा नियम आहे. व त्यास अपवाद नाही, म्हणून पंढरपूरच्या पोस्टाची कृति बरोबर आहे. नागपूरच्या पोस्टाचे लोक जिवंत माणसें आहेत असें दिसतें. अडचणी काय आहेत हें पाहून, त्यांनी तारतम्य वापरून दुर्लक्ष्य केलें येवढाच याचा अर्थ. असें दुर्लक्ष्य खात्याच्या नियमांप्रमाणें शासनीय आहे. मूळ चूक दुसरीकडेच आहे. नियमांचा उद्देश गैरफायदा घेतां येऊं नये येवढाच असतो, पण आजकाल रोमन कायद्याच्या चुकीच्या पायावर सर्व कायदे आधारलेले असल्यामुळें फाजील कायदेबाजीच वाढली आहे. १५–२० वर्षांनी पत्रें मिळालीं, अशा तक्रारींपैकीं कांहींत पत्र मूळ मालकांस मिळून पुनः घरांतील मुलांनी गमतीने पेटींत टाकलेलें असतें. पोष्टाच्या पेटींत पुष्कळच चिजा, उ. कचरा, फटाकडे, पेपरमिंटच्या चघळलेल्या गोळया, दगड, वगैरे सांपडतात. कांही वेळां 'कार्डावर जास्त शिक्के मारायचे नाहीत' अशा नियमांचा गैरफायदा घेऊन खोटा पुरावा तयार करण्यास व्यापारी लोक कमी करीत नाहीत. अशीं पत्रें मुद्दाम

पुनः पेटींत टाकून टाअिम्समधून आरडाओरड केली जाते. सार्वजनिक नीतिमत्ताच फार खालीं घसरल्यामुळें असें होतें, असा आक्षेप आहे, पण तो चूक आहे. २०० ते ३०० वर्षांचा अितिहास असा आहे कीं प्रत्यक्ष भीति नसेल तर सरकारी नोकर सर्रास गुन्हे करतात. पोस्टाचे नौकर ते करीत नसत, कारण सर्वांत खालच्या दर्जाचे, दुसरे कोठेही निरुपयोगी ठरतील असेच लोक १९२० पर्यंत पोस्टांत नोकरीस लागत. त्यांना भीति फार असे व म्हणून ते गुन्हे करीत नसत. तरीही संधि सांपडली कीं ते होतच. ज्या वेळीं वॉर-बॉण्ड सरकारने सक्तीचे केले, त्या वेळीं नुसता अर्जाचा फार्म देण्याबद्दल व तो भरून देण्याबद्दल पोस्टाच्या लोकांनीं पैसे खाल्ले आहेत. घड्याळें पुढें करून तारांवर बंद आफिसांची फी घेणें, हेंही सर्रास चालू आहे. याचें कारण मूळ पोस्टाचें काम म्हणजे पत्रें पोंचवणें हें कमी होऊन अितर भानगडीच फार वाढल्या. साहजिकच जास्त बुद्धीचीं व शैक्षणिक दर्जाचीं माणसें लागलीं. जी शिस्त दंडुक्यावर सहज असे, ती कायद्यावर आधारली जाऊं लागली व फाजील कायदेबाजीमुळें अेका नोकरास शिक्षा करण्यांत अेक अधिकारी ६ महिनेपर्यंत अडकून राहूं लागला. ज्याप्रमाणें आरोपीस शिक्षा न केली म्हणजे अपीलही होत नाही व ठपकाही येत नाही, म्हणून कांही मॅजिस्ट्रेट आरोपींस सोडून देण्याचा तडाखा ठेवतात, तशीच प्रवृत्ति सर्रास झाली आहे. या सर्वांस आळा घालणें शक्य होतें व तें संपानंतर लगेच. फक्त मौलिक कामें चालू करून, सुयंत्र करून, मगच हळूहळू बाकीचीं कामें सुरू करावयास हवीं होतीं. पण शक्य तों अमेरिकन सुधारणा आणावयाच्या घिसाडघाअींत मूळ कामच बाजूस रहात आहे. आतां संप झालाच ( बहुतेक होणार नाही ) तर ही गोष्ट जनतेनेच हातीं घेतली पाहिजे. पोस्टांत मुख्य काम पत्रें व तारा पोंचवणें हेंच पाहिजे व अितर सर्व दुय्यम करावयास हवींत. जर तें सध्यां जड वाटत असेल तर निदान मोठ्या पोस्टांत तरी ही विभागणी संपूर्ण करावयास हवी आहे. मासिकें टपालांत देतांनाच वेगवेगळ्या पोस्टांचे गठ्ठे

बांधून ते अंक पोस्टमास्तरांच्याच नांवानें पाठवावे, म्हणजे त्यांस तेवढे अंक आले कीं नाही हें पाहण्यास जबाबदार धरतां येअील. दरसाल अेक यादी पोस्टवार पुरवावी व अंक न आल्यास मास्तराने ताबडतोब कळवावें. साध्या पत्रांचा तपास लागणें अशक्यच असतें व तसा अगदीं छापील नमुनाही आहे. कागदटंचाअी व अव्यवस्थेचा कारभार म्हणून सध्यां फार्मांची तूट आहे अेवढेंच. आपला......

उ. आपल्या खुलाशावरूनच असें दिसतें की आपल्या देशांतील सार्वजनिक नीनिमत्तेचा दर्जा अितर देशांचे मानाने बराच कमी आहे. तो अलीकडेच घसरला नसून पूर्वीपासूनच तसा आहे अेवढेंच आपलें म्हणणें दिसतें. वर्तमानपत्रें वांटण्याची व्यवस्था आपण म्हणतां तशी जर्मनींत आहे. तेथें वर्गणीदारांची यादी व प्रत्येक अंकाच्या तितक्या मोजक्या प्रती टपाल खात्याकडे दिल्यास त्या वांटण्याची व्यवस्था आपोआप होते. अर्थात् टपालखर्च पडतो, पण त्रास वांचतो आणि प्रती चोरीस जात नाहीत. बँकेचें काम येथेंही टपालखातें अंगावर घेतें, परंतु लोकांची शक्य तितकी सोय करण्याची अिच्छाच खात्याला नाही. रिझर्व बँक सरकारीच आहे व पोस्टाची सेव्हिंग्ज बँक सरकारीच आहे, तरीपण सेव्हिंग्ज बँकेंत चेक घ्यायचे नाहीत असा नियम असल्यामुळें जेथें शंका घेण्यास जागा नाही असे सरकारी चेक देखील भरतां येत नाहीत. फ्रान्समध्यें वर्गण्या भरण्याकरतां सेव्हिंग्ज बँकेचा उपयोग करतां येतो. माझ्या अमुक नंबरच्या खात्यांतून वर्तमानपत्राच्या तमुक नंबरच्या खात्यांत अमुक रकम जमा करावी असें कळवलें म्हणजे मनीआर्डर करावी लागत नाही. या सर्व गोष्टी येथील टपालखात्याच्या अधिकाऱ्यांच्या नजरेस आणल्या तरी ते लक्षच देत नाहीत, कारण सरकारचीं खातीं लोकांच्या सोयीकरतां असावीं, हें त्यांच्या डोक्यांतच येत नाही. आतां लोकांचें सरकार आहे असें म्हणतात मात्र, पण कोणताही फरक दिसत नाही. कित्येक बँकांत सेव्हिंग्ज खात्यांत देखील चेकची पद्धत असते, पण सरकारी खात्यांत तें कसें होणार? परवा कोणाला आहे? **सं.**

## २

१. सर्वसाधारण प्रकृतीच्या मनुष्यास आठवड्यांतून किती वेळां संभोग करतां येतो? म्हणजे तो केल्यास त्याची प्रकृति बिघडत नाही? माझें वय सध्यां २८ वर्षांचें आहे व माझी प्रकृति साधारण अशक्तच आहे (माझें वजन फक्त १०२ पौंडच आहे). तरीपण माझी संभोगेच्छा फार आहे, म्हणजे मला आठवड्यांतून तीन वेळां तरी संभोग करावासा वाटतो, तरी ही माझी विकृति आहे का? याच्यामुळें पुढें माझी प्रकृति बिघडेल का? मीं असें अैकलें आहे की अतिसंभोग केल्यास पुढें क्षय होतो. मी माझ्या अिच्छाशक्तीवर ताबा ठेवण्याचा प्रयत्न केला, पण त्याचा परिणाम वाअीट होतो, म्हणजे मला अितर कांही सुचेनासें होतें. २. आम्ही आपल्या पद्धतीप्रमाणें संततिनियमन करीत असतों. पांच वर्षें झालीं. कांही दिवसांपूर्वी माझ्या पत्नीने कांही अितर कारणांस्तव अेका डॉक्टरणीला प्रकृति दाखवली व संततिनियमन करतों असें सांगितलें, तेव्हां तिने सांगितलें की असें करणें धोक्याचें आहे, कारण यामुळें पुढें गर्भाशय आपलें काम करूं शकत नाही व पुढें कधींच संतति होत नाही. तरी याचा खुलासा करावा. ३. मद्य, भांग, वगैरे सेवनाने संततीवर परिणाम होतो का? अशा माणसांची संतति अितरांप्रमाणें निरोगी निपजूं शकेल का? मी असें ऐकलें आहे कीं मद्य घेणाराची संतति रोगट असते, तरी हें शक्य आहे का? मद्य फार घेतल्यास पुढें आयुष्यांत काय दुष्परिणाम होतात हा खुलासा करावा. हल्ली कांग्रेस सरकारने जे वेश्याव्यवसायावर व दारूबंदीवर प्रयोग चालवले आहेत, म्हणजे वेश्या व दारू अजीबात बंद करण्याचें ठरवलें आहे, याबद्दल आपलें काय मत आहे? माझ्या मतें ही व्यक्तिस्वातंत्र्यावर हिटलरशाही आहे. यामुळें समाजाचा फायदा होण्याअैवजीं नुकसानच होअील. आपला—**अेक वाचक.**

उ. १. प्रकृति सर्वसाधारण नसते, ती ज्याची त्याची वेगळी असते, यामुळें सामान्य नियम सांगतां येणार नाही. आठवड्यांतून तीन वेळां संभोग करून प्रकृति बिघडते असें दिसल्यास दोनच वेळां करावा, तेवढेंही न

सोसल्यास अेकच वेळां करावा. हा ज्याच्या त्याच्या अनुभवाचा प्रश्न आहे. शरीर अशक्त झाल्यास प्रतिकारशक्ति कमी होते व क्षय होण्याचा संभव वाढतो हें खरें. 'अिच्छाशक्तीवर ताबा ठेवणें' याचा कांही अर्थ होत नाही. ज्याला अनुभवाने शिकतां येत नाही, त्याने अतिरेकाचे परिणाम सोसावे असें म्हणावें लागतें. २. आपल्या डाक्तरणीचें मत साफ चुकीचें आहे, कोणत्याही आधाराशिवाय ठोकून दिलेलें आहे. अशा डाक्तरणीकडे जाऊं नये हें बरें. ३. शरीरावर मादक पदार्थांचा अंमल असतांना संभोग होऊन गर्भधारणा झाल्यास संततीवर परिणाम होण्याचा संभव असतो. केवळ मनुष्य दारू पितो अेवढ्यामुळेंच संततीवर परिणाम होतो असें नाही. मद्याचे व भांगेचे अेकंदर परिणाम काय होतात हा फार मोठा विषय आहे, त्याचा विचार येथें करतां येणार नाही. दारूबंदी व वेश्याबंदी करण्याचे प्रयत्न पूर्वी अनेक ठिकाणीं झालेले आहेत व ते कधींही यशस्वी झालेले नाहीत. वेश्याबंदी करण्याचें सरकारने अजून ठरवलेलें दिसत नाही. दारूबंदीचे प्रयत्न अितर ठिकाणीं फसले असले तरी आपले फसणार नाहीत, असा सरकारला भ्रम आहे, त्याचें निरसन झाल्याशिवाय राहणार नाही. अर्थात् ते फसले तरी सरकार तें कबूल करील कीं नाही हा प्रश्न वेगळा, कारण राजकारणांत सत्याला जागा नसते. व्यक्तिस्वातंत्र्यावर हा घाला आहे यांत शंका नाही. ज्यांच्यापासून अितरांना त्रास होतो अशा दारुबाजांचें प्रमाण अतिशय कमी आहे. तेवढ्याकरतां अितर सर्वांना बंदी करणें हा केवळ जुलूम आहे. सत्ता हातीं असली म्हणजे जुलूम केल्याशिवाय ती गाजवल्याचें समाधान मिळत नाही, अेवढेंच त्यांतील मर्म आहे. **सं.**

३

खालील पत्र आतांच मिळालें, तें आपण प्रसिद्ध कराल अशी आशा बाळगतों.

नमस्कार. स. रवा. च्या फेब्रुवारीच्या अंकांतील आपल्या जाहिराती-प्रमाणें २५ अंक साध्या रजिस्ट्रीनी खालील कारणास्तव पाठवतों, व्ही. पी.ने

मोबदला भरपूर उपटून नव्हे. समाजस्वास्थ्य मासिक तोट्यांत चालतें व श्री. कर्वे सत्याकरतां तत्वनिष्ठेने झीज सोसतात, तर माझे पडून राहिलेले अंक जर आपण विकत घेतले तर दोडपट किंमत रु. ६-३-० परभारें श्री. र. धों. कर्वे यांजकडे माझेकडून किंवा आपणा दोघांतर्फे मदत म्हणून पाठवावी. फक्त टपालखर्च मला पाठवावा म्हणजे झालें. **वि. र. चि.**

**उत्तर.** आपले विचार फार प्रशंसनीय आहेत. अंक अजून मला मिळाले नाहीत, तरी मनीऑर्डरने रु. ६-३-० कर्वे यांस पाठवतों. आपणासारख्यांच्या उत्तेजनामुळेंच हें मासिक आजपर्यंत चाललें व पुढेंही सतत चालावें अशी माझी हार्दिक अिच्छा आहे. **त्रि. रा. कपाळे.**

( **टीप.** उद्यां मी मनीऑर्डरीने पैसे पाठवीन ).

[ या दोन्ही सद्गृहस्थांचे मी मनःपूर्वक आभार मानतों. **संपादक** ]

---

# शारदेचें पत्र

मूर्खपणाचे कायदे करण्यांत हिंदुस्थान आणि पाकिस्तान यांच्यांत चढाओढ लागलेली आहे. पाकिस्तानांत नुकत्याच झालेल्या कायद्याने वेश्यांना गुन्हेगार ठरवलें आहे आणि अर्थात् या गुन्ह्याला मदत करणारे आपोआपच गुन्हेगार ठरतात. वेश्या सांपडल्यास तिला अेक हजार रुपये दंड ठेवला आहे आणि तिला कोणी पुरुषाने मदत केल्यास दंडाशिवाय आणखी फटक्यांची शिक्षा सांगितली आहे. या कायद्यामुळें वेश्या वेगळ्या न राहतां अितर लोकांतच राहून धंदा करतील आणि त्या सांपडणार नाहीत, असें अेकाने सुचवलें, पण त्याचा उपयोग झाला नाही. राज्यकर्त्यांना अितिहासावरून कांहीं धडे शिकतां येतात ही कल्पना चुकीची आहे. मागें कायद्याचे अमुक परिणाम झालेले आहेत, हें सांगितल्याचा उपयोग होत नाही. आम्ही श्रेष्ठ आहोंत, आमच्यावर तसे परिणाम होणार नाहीत, हीच घमेंड हिंदुस्थानप्रमाणें

पाकिस्तानांतील राज्यकर्त्यांनाही असावी. मूर्खाला अक्कल कोण शिकवणार ? ती शिकवून येत नाही.

मद्रास सरकारनेंही नुकतेंच आपल्या मूर्खपणाचे जाहीर प्रदर्शन केलें आहे. कित्येक ठिकाणीं पाऊस पडला नाही, किंवा कमी पडला, म्हणून पावसाकरतां ठिकठिकाणीं प्रार्थना करण्याबद्दल सरकारनें लोकांना विनंति केली आणि लोकांनी त्याप्रमाणें केलें. धार्मिक लोकांची कल्पना अशी असते कीं ईश्वराला कांही फारशी अक्कल नसते, आणि काय करावें हें त्याला न कळल्यास आपण तें त्याला प्रार्थनेंत शिकवूं. कदाचित् अमुक ठिकाणीं पाऊस पाडायचा विस्मरणाने राहिला असेल, तेव्हां त्याला आपण आठवण करून देऊं, अशीही कल्पना प्रार्थनेच्या मुळाशीं असणें शक्य आहे. मोरोपंताला वाटलें ' तसाचि उरलों कसा, पतित मी नसें काय कीं ?' एकंदरींत ईश्वर सर्व शक्तिमान असला तरी त्याला आपल्यापेक्षां अक्कल कमी, किंवा सर्वसाक्षी ईश्वराला स्मरणशक्ति कमी असावी, किंवा त्याला पाऊस पाडण्याची इच्छा झाली नाही, पण आपण त्याच्यापुढें लोटांगणें घातल्यानें कदाचित् त्याला दया येऊन तो पाऊस पाडील, असेंही कोणाला वाटत असेल.

कांग्रेस सरकारने पदव्या बंद केल्या आहेत अितकेंच नव्हे तर ज्यांना पूर्वी पदव्या मिळाल्या असतील त्यांच्याही पदव्या आम्ही वापरणार नाही अशी घोषणा केली आहे. वास्तविक हा मूर्खपणा आहे. कांही पदव्या नालायक लोकांना मिळत असत हें खरें, पण हल्लीं जे कांग्रेस अधिकारी विद्यापीठांकडून फुकटच्या पदव्या घेत फिरत असतात, ते या पदव्यांना लायक असतात का ? कीं अधिकार हीच त्यांची लायकी ? ब्रिटिश सरकार देखील फुकट पदव्या देत नसे, पदव्यांकरतां कांही कार्य करावें लागत असे, किंवा निदान भरपूर पैसे ओतावे लागत असत. हे पैसे बहुधा जनतेच्या कार्याला लागत असत, किंवा कांही सरकारलाही मिळत असले, तरी हल्लीं सरकार जनतेचेंच असल्यामुळें असे पैसे देणारा मनुष्य जनतेचेंच

कल्याण करतो असें समजलें पाहिजे. पदवीच्या आशेने जर अेखाद्या धनिकाकडून जनतेचें कार्य झालें तर त्यांत बिघडलें कोठे? शिवाय पैसा न देतांही जीं माणसें खरोखर लायक वाटतील, त्यांचा सन्मान करण्याचा तो अेक मार्ग आहे. हल्लीं सरकारच्या हातांत सन्मान करण्याचें साधन म्हणजे अधिकाराच्या जागा देणें. पण अशाने या जागा भलत्याच लोकांना मिळतात आणि जनतेचें नुकसान होतें. जे सन्मानाला लायक असतील, ते अधिकाराच्या जागेला लायक असतात असा नियम नाही, तेव्हां पदव्या न देण्यांत कोणताही शहाणपणा नाही, केवळ सरकारी घमेंडखोरपणा आहे, स्वतःच्या मानीव मोठेपणाचें प्रदर्शन आहे. स्वतःला विद्यापिठांकडून पदव्या मिळतातच आहेत, लोकांना न मिळाल्या तर काय बिघडलें? उलट जितक्या कमी लोकांना पदव्या मिळतील तितकी पदव्यांची किंमत वाढते.

'विभावरी शिरूरकर' संबंधी जें नवीन पुस्तक निघालें आहे, त्याला शेजवलकरांनी प्रस्तावना लिहिली आहे म्हणे. मी तें पुस्तक पाहिलें नाही, फक्त त्याच्यावर आलेली कांही टीका वाचली आहे. कोणी म्हणतो त्या पुस्तकांत वाचण्यासारखा भाग म्हणजे प्रस्तावनाच आहे. पण नागपूरच्या 'भवितव्यांत' या प्रस्तावनेवर जी टीका आली आहे, तीवरून या प्रस्तावनेचा मुख्य भर कांग्रेसला शिव्या देण्यावर आहे, आणि अर्थातच तें 'भवितव्याला' कसें खपणार? तेव्हां प्रो. अ. ना. देशपांडे यांनी अेक लेख लिहून शेजवलकरांवर सूड घेतला आहे. त्यांनी शेजवलकरांच्या मनाला मैल्याची गाडी म्हटलें आहे, पण त्यांनी स्वतः शेजवलकरांना गलिच्छ शिव्या दिल्या आहेत, तेव्हां त्यांच्या मनाला काय म्हणावें? शेजवलकर कांग्रेसला विरोध करतात, म्हणून ते त्यांना पाकिस्तानांत पाठवण्याची सूचना करतात, पण पाकिस्तान सरकार कांग्रेसच्या ताब्यांत नसल्यामुळें त्यांना तेथें प्रवेश मिळेलच असें नाही. पाकिस्तानांत पाठवण्याचें कारण काय, तर त्यांनी गांधींची निंदा आणि जिनाची स्तुति केली आहे. गांधींनी किंवा कांग्रेसनेही स्वराज्य मिळवून दिलें नाही, जागतिक परिस्थितीमुळें तें आपो-

आप मिळालें, हें आज पुष्कळांना उघड दिसत आहे. प्रो. देशपांडे चिडून विचारतात, तें गांधींनी नाहीतर काय हिटलर-म्युसोलिनींनी मिळवून दिलें? त्यांनी मिळवून दिलें नसलें, तरी जागतिक परिस्थिति त्यांच्यामुळें निर्माण झाली आणि आज स्टालिनची भीति सर्व जगाला वाटत आहे. अर्थात स्टालीनच्या ओंजळीनें पाणी पिणाऱ्या कॉम्युनिस्टांना त्यांत आनंदच आहे, पण स्टालिनची हुकूमशाही कोणाही समंजस माणसाला पसंत पडणार नाही. तथापि अेकंदरींत स्टालीनच्या आणि कॉम्युनिस्टांच्या भीतिप्रद कारवायांमुळें स्वराज्य मिळालें, सत्याग्रहाने तें आणखी शंभर वर्षांतही मिळालें नसतें, हें कोणालाही दिसण्यासारखें आहे. अर्थात् तें डोळस लोकांनाच दिसेल, गांधींच्या अंधभक्तांना दिसणार नाही.

जगांत आज हिंदुस्थानला भयंकर मोठें स्थान मिळालें आहे, असाही प्रो. देशपांड्यांचा अेक गैरसमज आहे, पण हिंदुस्थानसारखें भिकारडें राष्ट्र कोणाचें काय वाकडें करणार? अन्नाकरतां ज्याला जगापुढें तोंड वेंगाडावें लागतें, त्याची किंमत दारावरच्या भिकाऱ्यांपेक्षां अधिक काय असणार? पण आमच्याजवळ अन्न नसलें म्हणून काय झालें, सगळ्या जगाला उपदेश करण्याची पात्रता आमच्या अंगांत आहे, असा अेक लोकभ्रम गांधींसारख्यांनीच उत्पन्न करून ठेवला आहे. ज्याच्या अंगांत ताकत नाही, त्याने शांततेचा पुरस्कार करावा यांत नवल काय? हा काय मोठेपणा झाला? असल्या मोठेपणाला कोण विचारतो आणि त्याची काय किंमत आहे?

प्रो. देशपांडे चिडून विचारतात, गांधी, नेहरू, पटेल वगैरे अंगचोर होते काय? ते अंगचोर नसले आणि तुरुंगांतही गेले असले, तरी ज्यांना तुरुंगांत पहिला वर्ग मिळाला, त्यांचे तेथें बिलकुल हाल झाले नाहीत हें सर्वांना माहीत आहे. शेजवलकरांसारखे कांही लोक तरी कांग्रेसला विरोध करणारे आहेत हें अेक सुचिन्ह आहे. पण तरीदेखील आजच्या विधिमंडळांत कोणाचाच विरोध नसल्यामुळें पाहिजे ते कायदे भराभर मंजूर होत आहेत. ज्या अिंग्लंडांतून ही राज्यव्यवस्था सर्व जगभर पसरली आहे, तेथें सरकारच्या विरुद्ध पक्षाच्या पुढाऱ्याला

दोन हजार पौंडांचें वार्षिक वेतन असतें. पण येथें पहावें तों विरोधी पक्षच राहू नये अशी कांग्रेसची खटपट असते. अशा दडपशाहीनें देशाचें नुकसानच होणार आहे, हें समजण्याइतका दूरदर्शी किंवा निःस्वार्थी मनुष्य आज कांग्रेसमध्यें नाही. विरोधकांविषयीं खुद्द गांधींची वृत्ति देखील मोठीशी समंजस नव्हती. आपण म्हणतों तेंच खरें, अशी त्यांची सत्याची व्याख्या होती. पण आतां हें सांगणें म्हणजे पाप आहे, कदाचित् गुन्हा देखील ठरायचा.

गांधींच्या तत्वज्ञानाची ( ? ) पोपटपंची करण्याच्या भरांत आपल्या बोलण्याचा कांही अर्थ होतो की काय हें देखील त्यांचे अनुयायी पहायला विसरतात. परवां भारत लोकसभेंत अर्थमंत्र्यांनी सांगितलें कीं जर हिंदुस्थानच्या आर्थिक उत्पन्नावर नीट लक्ष दिलें तर पुढच्या किंवा त्यापुढच्या पिढींत हिंदुस्थानची लोकसंख्या ही खर्चाची बाब न ठरतां सामर्थ्याचें प्रतीक ठरेल. खुषीच्या संततिनियमनाचा मी व्यक्तिशः पुरस्कर्ता आहें. पण अनैसर्गिक मार्गांनी ती गोष्ट करूं गेल्यास पुन्हां अवघड प्रश्नाला तोंड द्यावें लागेल. या आचरटपणाला उत्तर काय देणार ? हा बेजबाबदार भाषणाचा सुंदर नमुना आहे ! संततिनियमनाचा कोणताही नैसर्गिक मार्ग नाही, हें या शहाण्यांना माहीत असूं नये ? गांधीजींचा ब्रह्मचर्याचा मार्ग तर सर्वांत अनैसर्गिक आहे, हें विचार करणाराला समजेल, पण विचाराची शक्ति असलेला मनुष्य असें आचरट भाषण करणारच नाहीं. भिकाऱ्यांची लोकसंख्या ही कधींही सामर्थ्याची बाब ठरणें शक्य नाही. पुढच्या किंवा त्यापुढच्या पिढीच्या गप्पा मारण्यापूर्वी तेथपर्यंत लोक जगतील कसे, याचा विचार कांही या दीडशहाण्यांना सुचत नाही. भिकारी ते भिकारी, आणि सामर्थ्याच्या बढाया मारतात ! अन्नाशिवाय सामर्थ्य मिळवण्याची कांही युक्ति या मंत्र्यांजवळ आहे काय ? म्हणे खुषीच्या संततिनियमनाचा मी पुरस्कर्ता आहे. सक्तीच्या संततिनियमनाला अजून पुष्कळ अवकाश आहे. त्याची गोष्टच कोणी बोलत नसतांना या वाक्याचा कांहीं अर्थ होतो का ? पण अर्थाकडे पहायचें कारण काय ?

तुझी शारदा